# <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ६९/२०२४ मधील आदेश नि.क्र. १६</u>

१. प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल यावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादीचे म्हणण्यानुसार मुदतीत कैफियत सादर करावी परंतु प्रतिवादी क्र. १ हे अडाणी व शेतकरी असून त्यांना शेतातील कामामुळे व आजारपणामुळे त्यांना विहित मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी सुमारे एक ते दिड वर्षांचा विलंब झाला असून प्रतिवादी क्र. १ यांनी जाणुनबजून उशीर केलेला नाही. प्रतिवादी क्र. १ यांना दाव्याचे कामी त्यांची कैफियत व म्हणणे देण्याची संधी देणे जरुरीचे व न्यायाचे आहे अन्यथा प्रतिवादी क्र. १ यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे.

२. वादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे. वादीने कथन केले की, प्रतिवादीचा अर्ज खरा व बरोबर नाही. कारण संयुक्तिक नाही. केवळ दाव्याचे कामकाज प्रलंबित रहावे म्हणून विलंब केला आहे. प्रतिवादी दिनांक ०९/१२/२०२४ रोजी दाव्यात हजर झाले आहेत.२०२४ पासून आजतगायत म्हणणे देणेकामी दिलेली उशीराची कारणे योग्य नाहीत. वादीने प्रस्तुत प्रकरणात सरतपासाचे शपथपत्र देखील दाखल केले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे. अर्ज मंजूर करणे झालेस रु. १०,०००/– कॉस्ट करण्यात यावी.

३. वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. सदरचा दावा वादीने, प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी यांना समन्सची बजावणी होवुन ते न्यायालयात दिनांक ०९/१२/२०२४ रोजी हजर राहिले परंतु वेळेत कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ विरुद्ध दिनांक २८/०३/२०२५ रोजी विना कैफियतचे आदेश पारित झाले आहेत. यावरुन प्रतिवादी क्र. १ यांना कैफियत दाखल करण्यास सुमारे दिड वर्षाचा विलंब झाल्याचे दिसून येते. प्रतिवादीने दिलेले विलंबाचे कारण पाहता विलंबाच्या अवधीसाठी सदरचे कारण योग्य नाही. वादीने प्रस्तुत प्रकरणामध्ये सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन पुरावा दिला आहे. वादीने पुरावा दिल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे हे प्रतिवादीचे दाव्यास विलंब

करण्याचे कृत्य दिसून येते.

५. परंतु सदर दावा गुणदोषावर निर्णयाक करण्याकरीता व नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. अर्जामध्ये नमूद केलेले कारण प्रतिवादी यांची कैफियत दाखल करण्या करिता झालेला विलंब माफ करण्याकरिता संयुक्तिक नसलेतरीही दोन्ही पक्षांच्या दृष्टीने न्यायाचा विचार करता सदरचा अर्ज मान्य करणे योग्य ठरते. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांना वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस जास्तीच्या खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्व ध्यानात घेता व न्यायाचे हित जोपासण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित होईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी यांनी रक्कम रुपये रु.२०००/– (रक्कम दोन हजार फक्त) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द पारीत झालेला दिनांक २८/०३/२०२५ रोजीचा विना कैफियत सुनावणीचा आदेश रद्दबातल करण्यात आला. प्रतिवादी क्र. १ यांनी वादीस खर्च दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

सही/–

(श्रीमती रेवती पी. बागडे)

दिनांकः– २४/०४/२०२६ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. R.P. Bagade,<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/04/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 24/04/2026 |